**नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत शासकीय गोदाम बांधकामास निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्र.गोदाबां १०१२/१०२४/प्र.क्र.३१३/नापु-१६ ब,**
**मंत्रालय विस्तार , मुंबई-४०००३२.**
**दिनांक : २२ जानेवारी, २०१३.**

वाचा:- १. शासन निर्णय क्र.गोदाबां-१०१२/प्र.क्र.११०/ नापु-१६-ब, दिनांक १७ सप्टेंबर, २०१२
२. शासन निर्णय क्र.गोदाबां-१०१२/१०२४/ प्र.क्र.९१ नापु-१६-ब, दिनांक २० नोव्हेंबर ,२०१२

**प्रस्तावना:-**

उक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सन २०१२-१३ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या गोदाम बांधकामापैकी काही कामास निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

संदर्भाधीन शासन निर्णयामधील अटीच्या अधीन राहून पुढील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

शासकीय गोदाम बांधकामाची यादी .

| अ. क्र. | जिल्हा | बांधकामाचे/ गोदामाचे नाव | गोदामांची संख्या | छाननीअंती अंदाजित खर्च | सद्यस्थितीत उपलब्ध करुन देण्यात येणारा निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ७ |
| १ | ठाणे | अंबरनाथ | १ | १,०६,३९,४८८ | ६५,६४,२०१ |
| २ | ठाणे | पालघर गोदाम क्र.१ | १ | १,९६,८६,००० | ९८,४३,००० |
| ३ | ठाणे | पालघर गोदाम क्र.२ | १ | १,९६,८६,००० | ९८,४३,००० |
| ४ | बीड | शिरूर | २ | २,३५,४९,७७२ | १,१७,७४,८८६ |
| ५ | बीड | पाटोदा | १ | ९८,७३,३८३ | ४९,३६,६९२ |
| ६ | बीड | परळी (टोकवाडी) | १ | ८४,६९,२८२ | ४२,३४,६४१ |
| ७ | बीड | वडवणी | २ | १,९५,१९,०९७ | ९७,५९,५४९ |
| ८ | भंडारा | तुमसर, | १ | १,०१,१८,८९० | ५०,५९,४४५ |
| | | एकूण | १० | १२,१५,४१,९१२ | ६,२०,१५,४१४ |
| | एकूण रुपये सहा कोटी, वीस लाख पंधरा हजार चारशे चौदा फक्त. | | | | |

२. उपरोक्त खर्च "मागणी क्र.एम-४, मुख्यलेखाशिर्ष '४४०८, ०२ अन्न साठवणूक व वखार साठवणूक यावरील भांडवली खर्च ०१/ अन्न १०१ प्रापण व पुरवठा, ०२ अन्न साठवणूक व वखार साठवणूक १०१, ग्रामीण गोदाम कार्यक्रम, (०१) नवीन गोदामांचे बांधकाम (०१)(०१) नवीन गोदामांचे बांधकाम (मुफसल)(योजनेंतर्गत) (४४०८ ०२४६), ५३ मोठी बांधकामे" या लेखाशिर्षांतर्गत व सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. वरीलप्रमाणे निधी उपलब्ध करुन दिलेल्या शासकीय गोदाम बांधकामाची कामे तातडीने करण्यात येऊन पूर्ण करण्यात यावीत. गोदाम बांधकाम सुरु झाल्यांतर प्रथम बांधकामाचा संपूर्ण तपशिल तसेच संबंधित बांधकामाचा दरमहा आढावा घेऊन बांधकामाची प्रगती, जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी शासनास सादर करावी.

४. सदरील शासकीय गोदाम बांधकामाची कामे पूर्ण होताच त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करण्याची दक्षता जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी घ्यावी.

५. बांधकामास विलंब अथवा इतर कारणानी गोदाम बांधकामास वाढीव खर्च होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

६. सदर गोदामांचे बांधकामाचे काम प्रगतीपथावर असताना संबंधीत अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बाधंकाम विभाग यांनी कमीत कमी तीन वेळेस भेट देऊन कामाची गुणवत्ता उत्कष्ट असल्याची खातरजमा करावी व तसा अहवाल जिल्हाधिकारी यांना वेळोवेळी लेखी स्वरुपात सादर करावा.

७. गोदामाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर गोदामाचा ताबा घेण्यापूर्वी सदर गोदामास जिल्हाधिकारी यांनी स्वतः भेट देऊन झालेले काम हे उत्कृष्ट दर्जाचे असल्याबाबत खातरजमा करावी. काही त्रुटी राहून गेल्या असल्यास त्याची पूर्तता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करुन घ्यावी व त्याचा स्थळ निरीक्षणाचा अहवाल अभिलेखामध्ये जतन करुन ठेवावा.

८. सदरचे आदेश प्राप्त होताच सदरील तरतुद जिल्हाधिकाऱ्यांमार्फत तात्काळ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित कार्यकारी अभियंता यांना अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात यावी. धनादेशाने आहरीत करण्यात येऊ नये.

९. सदर आदेशान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी ठेव अंशदान म्हणून वर्ग करता येणार नाही.

१०. वित्तीय अधिकार नियम पुस्तीका १९७८ च्या भाग-१ ,उप विभाग ५ मधील अनुक्रमांक-१ नुसार व महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीकेतील परिच्छेद क्रमांक-१३४ नुसार प्रशासनिक विभागास वित्तीय अधिकारानुसार सदरचा आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१३०१२३१०२३१४५३०६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( रमेश मु.मनाळे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
१) उप आयुक्त (पुरवठा), कोकण, औरंगाबाद, नागपूर
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
३) जिल्हाधिकारी, ठाणे, बीड, भंडारा.
४) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा ठाणे, बीड, भंडारा.
६) जिल्हा पुरवठा अधिकारी, ठाणे, बीड, भंडारा.
७) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे, बीड, भंडारा.
८) महालेखापाल-१/२, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
९) महालेखापाल-१/२, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१०) निवासी लेखा अधिकारी, मुंबई (वित्तीय सल्लागार व उपसचिव मार्फत)
११) वित्त विभाग (व्यय-४, अर्थोपाय,अर्थबळ व अर्थसंकल्प-१६), मंत्रालय, मुंबई.
१२) नियोजन विभाग (का-१४११), मंत्रालय, मुंबई.
१३) सहाय्यक संचालक (संगणक) लेखा व कोषांगारे, मुंबई/नागपूर.
१४) उपमहाव्यवस्थापक,नाबार्ड,५४,वेलस्ली रोड,शिवाजीनगर पुणे ४११००५
१५) निवड नस्ती/नापु-१६ब.